# एक अनोखी 'सुहासमय नखचित्रकला'

उषादेवी विजय कोल्हटकर

सुहास तवकर या प्रतिभावंत चित्रकाराच्या व माझ्या परिचयाची दीर्घ वाटचाल किती अधुरी आहे याचा प्रत्यय, २३ जून २००८ रोजी, दुपारी एक वाजता, दूरदर्शन-वाहिनी ७६ अर्थात QPTV वरील त्यांची मुलाखत पाहिली व ऐकली तेव्हा आला. सृष्टीनिर्मितीतील सौंदर्यविभूषित, मनाला भावणारे, दृष्टीसुखाला कुरवाळणारे जे कांही आहे, त्याचे नख-चित्रण कुशलतेने करु शकणारा, हा मनस्वी चित्रकार इतपत गुणी आहे याची मला पूर्ण कल्पना नव्हती म्हणून परिचय संपूर्ण नव्हता हे प्रकर्षाने जाणवले. क्षणाच्या विस्तारात खूप कांही सामावू शकते हे सांगणाऱ्या, समयसापेक्षतेच्या सिध्दांताबद्दल फक्त ऐकले होते पण त्याचा अनुभव घेतला नव्हता. या मुलाखतीने तो सुखद अनुभव दिला. मुलाखतीच्या त्या कांही क्षणांच्या विस्तारात, सुहास तवकरांच्या घराण्याने पिढ्यानपिढ्या जपलेल्या, जोपासलेल्या 'नख-चित्रकला' या विधेच्या अनन्यसाधारणत्वाचे दर्शन झाले. या चित्रकाराच्या कलाप्रेमासोबत त्यांच्या पूर्वजांनी जपलेल्या कलेचा वारसा, पुढच्या पिढीपर्यंत पोचवुन, सामाजिक ऋण फेडण्याचा सुहास यांचा दृढ संकल्प त्यांच्या दिलखुलास व्यक्तित्वाने जपलेल्या भारतीय संस्कारांकडे संकेत करीत होता.

संगीताच्या तालावर, पैंजणांच्या झणत्कारात स्वतःच्या नृत्यकलेचे नैपुण्य दाखविणारे पाय पाहिले होते. रंगतुलिका कुशलतेने पेलणारे हात पाहिले होते. पाषाणातुन कोरीव मूर्ती घडविणारे शिल्पकार पाहिले होते, पण नखांना माध्यम बनवुन, उपकरण बनवुन आखीवरेखीव चित्रनिर्मिती करु शकणारा कलावंत पाहिला नव्हता. प्रथितयशा कलाकाराच्या पावलावर

पावले टाकीत चालले तर वाटचाल सुसह्य होते. मार्गदर्शकाचे
बोट धरून चालले तर दिशा हरवत नाही पण चिमुकल्या
नखांच्या साथीने एका प्रशस्त कलादालनाची निर्मिती करता येते
हे वास्तव मला नवखे होते. बालपणी पित्याच्या कलाश्रमाचे
अनुकरण करण्याच्या प्रयत्नांनी, सुहास यांच्यातील कलागुणांचा
शोध, असा मान विसरून घेतला की, त्यांनी कुठल्या
चित्रनिर्मितीने, त्यांना सन्मान होऊन जगणे शिकविले. स्वतःच्या
मुलांच्या आवडीचा कल, या कलेकडे नाही हे लक्षात येताच
सुहासचे प्रयत्न समाजाभिमुख बनले. चित्रकलेची जाण
असणाऱ्या कलाप्रेमी युवकयुवतींना जिव्हाळ्याने नख-चित्रकला
शिकविण्यासाठी, संगणक माध्यमाद्वारे या कलेचा प्रचार, प्रसार,
विस्ताराच्या संभावनांच्या मागील, महामार्ग बनविण्यासाठी
त्यांनी www.google.com या वेबसाईटवर स्वतःच्या
वेबसाईटची माहिती नोंदवली. उत्सुक कलावंतांच्या जिज्ञासा,
कुतूहलाला उत्तरे देण्यासाठी वेबसाईट सिद्ध झाल्या. आज
दूरदर्शन संचारमाध्यमानेही त्यांच्या कलेची रास्त दखल घेतली.
सुहास यांचे स्वप्न साकार होण्याच्या दृष्टीने या मुलाखतीने,
या दुर्लभ कलेचा प्रवास. कांही अंशी सुलभ केला हे निश्चित.
सुहास यांच्या निवासस्थानी झालेले मुलाखतीचे चित्रीकरण
व सादरीकरण तंत्रदृष्ट्या कसे होते हे पाहण्याची आठवणही
न व्हावी इतपत या चित्रकाराची कलेबद्दलची तळमळ बोलकी
होती. मुलाखतीच्या संयोजकांची कलापारखी रसिकता मान्य
करूनही, एका मराठी व्यक्तीचे अमेरिकेच्या दूरदर्शन माध्यमावर
कांही काळ असलेले प्रभुत्व, माझ्या मराठी मनाला अभिमान-
क्षण देण्यात यशस्वी झाले.

सुहास यांच्या बोलण्यातुन जाणवले की, जगात
या कलेबद्दल अनास्था आहे असे नाही, पण केवळ

कलाप्रेमी व्यक्तींच्या अज्ञानामुळे ही कला अज्ञातवासात राहिली, विकसीत होण्यापासून वंचित राहिली. चित्रकलेच्या विस्तृत क्षितीजावर स्वतःचे आगळे स्थान आरक्षित करण्याची क्षमता असलेली नख-चित्रकला, कालिदासाच्या नायिकेला, शकुंतलेला कमळपत्रावर, प्रेमपत्र लिहिण्यासाठी मदत करणारी नख-चित्रकला, एक हरवलेली, विलोप पावत चाललेली कला म्हणून इतिहासजमा होऊ नये या दृष्टीने, सुहास निष्ठेने प्रयत्नाधीन आहेत. मुलाखतीमध्ये सुहास-निर्मित नख-चित्रांनीही आपले नखाग्रिखानं आगळे अस्तित्व दिमाखाने जाणवून दिले. एका चित्रात, चित्रकाराच्या नखांच्या कुशल स्पर्शाने, पक्षाचे रूप हुबेहूब साकार झाले होते. सुहासच्या नखांनी, पक्ष्याच्या पंखावरील बारकावे चित्रीत करताना काय जादू केली होती, न कळे, कागदावर रोमांच उभे राहिल्याचे स्पष्ट दिसत होते. प्रत्येक कागदावर उमटलेल्या रेषांच्या आकारबद्ध आकृतींवरील रोमांच पाहिले व मला वाटले, सुहासच्या नखांना देखील पंख आहेत म्हणूनच त्यांच्या अभिजात निर्मितीच्या भरारीसाठी आकाशानेही स्वतःची उंची वाढविली तर मला आश्चर्य वाटणार नाही.

मोहक हास्याचे धनी, सुहास स्वतःच्या नावाला सार्थ करीत, कागदावर, रेखीव प्रमाणबद्धतेला रोमांचित करण्यात गुंगून जातात. त्यांची नखे, कलासौंदर्याचे मित्र बनून, सुहासच्या प्रतिभेला जीवापाड जपतात. सुहास यांच्या रियाजाचे वय लक्षात घेता, त्यांच्या नखांचे शक्तिसीमित बळ देखील, वेळेचे भान न ठेवता त्यांना उत्कटतेने साथ द्यायला शिकले आहे हे प्रकर्षाने जाणवते. विधात्याच्या सौंदर्य-श्रीमंत सृष्टीतील वैविध्य, सुहासच्या सन्मानार्थ चित्र-विषयांचा खजिना उघडून त्यांची प्रतिक्षा करण्यात

समाधान व्यक्त करते. अभिव्यक्ती माध्यमाचे साधन बनून, देवदत्त चिमुकली नखं अनंत विलोभनीय चित्रनिर्मिती करू शकतात. Embossing, Engraving करताना, सुहाससाठी संस्कृतिकार्य भिंतींचे काम करतात ते पाहून मी थक्क होते. चित्रांच्या विलोभनीय उठावदारपणामुळे, या Relief Artist च्या व्यक्तिमत्वाला वेगळाच उठाव येतो. अंध रसिकांच्या स्पर्शाची भाषा, सुहास यांच्या नख-कृतींचे सुरुचीपूर्ण उठाव वाचते व त्यांच्या चेहऱ्यावरची प्रसन्नता, सुहासच्या समाधानाचे कारण बनते. सुहास यांच्या वेबसाईटच्या प्रवासामुळे, जगातील कांही विद्यार्थी त्यांच्याबरोबर संपर्क साधू लागले आहेत. चित्रकलेच्या या माध्यमावर संशोधन करणारे स्वतःच्या शोध-निबंधात सुहासच्या या क्षेत्रातील कर्तृत्वाचे मूल्यमापन करू लागले आहेत. चित्रकला-क्षेत्राच्या परामर्श घेणाऱ्या, न्यूयॉर्कमधून प्रकाशित होणाऱ्या "Artist" मासिकात लौकरच सुहासची मुलाखत प्रसिद्ध होणार आहे. चित्रकलेच्या विविध शाखांचे अभ्यासक, संशोधक, त्यांच्या संदर्भग्रंथात सुहासच्या कार्याचा उल्लेख मोठ्या सन्मानाने करू लागले आहेत. सुहास यांच्या या अनोख्या कलेच्या, कलापूर्ण प्रवासासाठी अनेकानेक शुभकामना. भविष्यात स्वतःच्या नखांच्या जोडीने अनेक चित्रकारांच्या नखांना या कलेत पारंगत करण्याच्या त्यांच्या स्वप्नाची पूर्तता लौकरच दृष्टिक्षेपात येईल, याबद्दल मी निश्चिंत आहे. सुहास यांचे या कलेतील कमालीचे प्रभुत्व पाहून, आपल्या चित्रांना, सुहास यांच्या सृजनात्मकतेच्या नखाचीही सर येणार नाही असे मानणारे शिष्य त्यांना भेटू नयेत, तर खरे कलाप्रेमी भेटावेत हेच इच्छा.

सुहासच्या या कलासाधनेत स्वानंद-निर्मिती आहे, कलाप्रेम आहे, रसिकता आहे, वारसा जपण्याची मन:पूर्वकता आहे.

आजही, या कलेच्या प्रवासाबद्दल असलेले चित्रकाराचे कुतूहल, नखचित्रकलेत, calligraphy - सुलेखन कलेचा उगम पाहते. देवाने दिलेल्या अवयवांना उपकरणे बनविणाऱ्या कोळ्याच्या जाळ्याची, गवळणीच्या घरट्याची कलाकुसर त्यांना मोहित करते. सुतारपक्षाच्या चोचीची आठवण करीत ते स्वतःच्या नखाकडे पाहतात व या अजोड देणगीबद्दल जगन्नियंत्यापुढे नतमस्तक होतात. "तिखे, तिखाला पाणीदार करते" या न्यायाने नखे सुहासच्या कलेला दिमाखदार करतात हे निश्चित. या क्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वाचा चढता आलेख पाहिल्यावर मला वाटते, "करागे्र वसती लक्ष्मी" या उक्तीप्रमाणे 'सुहासच्या नखाग्रे वसती, अद्वितीय नख-चित्रकला' अशीही उक्ती चित्रकला-जगतात लौकरच रूढ होईल.

सुहासच्या नख-चित्रकलेच्या संदर्भातील विलक्षण सौंदर्य-शोध पाहिला व जाणवले की खलिल जिब्रान यांना अभिप्रेत असलेल्या सौंदर्याच्या परिभाषेचे मर्म सुहासला निश्चित उमगले असावे. खलिल जिब्रान लिहून गेले —

"सौंदर्य हे स्वतःच तुमच्या मार्ग व मार्गदर्शक
बनलं नाही तर तुम्ही त्याला कुठं शोधणार
आणि कसं मिळवणार?"

* * *